# संशोधकांनी 'पेटंट' घेऊनच संशोधन प्रसिद्ध करावे : फ्रेंड

**पुणे, ता. १८ :** "स्पर्धेच्या युगात भारतीय संशोधकांनी प्रथम पेटंट घेऊन नंतर आपले संशोधन प्रसिद्ध करावे," असा सल्ला प्रसिद्ध संशोधक आणि केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक सर रिचर्ड फ्रेंड यांनी आज दिला. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (एनसीएल) 'व्हेंचर सेंटर'च्या उद्‍घाटनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. या वेळी विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर, 'एनसीएल'चे संचालक डॉ. एस. शिवराम उपस्थित होते.

डॉ. फ्रेंड म्हणाले, "गेल्या दशकात केंब्रिजमध्ये उत्पादनाशी निगडित मोठ्या प्रमाणात संशोधन करण्यात आम्ही यशस्वी झालो. परंतु, आधी पेटंट न मिळवता ते संशोधन प्रसिद्ध केल्यामुळे त्याचा फायदा इतरांनाच झाला. भारतीय संशोधकांनी या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन संशोधन पूर्ण होताच पेटंट मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू करावेत."

डॉ. माशेलकर म्हणाले, "आपण नेहमी 'सिलिकॉन व्हॅली'मधील संशोधन, विकास आणि त्यामध्ये भारतीयांच्या योगदानाबद्दल बोलत असतो. भारतामध्येही उद्योगांच्या विकासासाठी अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध केल्या तर भारतीय तंत्रज्ञांना, संशोधकांना देशातच कार्य करण्यास वाव मिळेल. यासाठीच 'व्हेंचर सेंटर' सुरू करण्यात आले आहे. भारतात इतर शहरांतूनही येत्या दहा वर्षांत अशीच व्हेंचर सेंटर्स उभारण्यात येतील."